**दिवाणी किरकोळ अर्ज १९/२०२६**
**श्री. बंडु लक्ष्मण काईंगडे**
**वि.**
**कोणीही नाही.**

## निशाण १ खाली आदेश पारीत

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी केला आहे.

## अर्जदार यांची अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे

२. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे म्हणणे असे की, अर्जदार हे कोडोली, ता. पन्हाळा येथील कायम रहिवासी आहेत. अर्जदार यांचे भाऊ केशव लक्ष्मण काईंगडे हे दि. २३.०९.२०१७ रोजी मौजे. कोडोली, ता. पन्हाळा येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत. तसेच त्यांच्या पत्नी कै. पार्वती केशव काईंगडे या दि. १८.११.२०१० रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच त्यांना कोणतेही अपत्य नाही. ते दोघेही अर्जदार यांचे समवेत सदर नमूद पत्यावर राहत होते. तसेच मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचा सांभाळ, औषधपाणी, कपडेलत्ता हे सर्व अर्जदार यांनीच केलेले आहे. तसेच ते हयात असताना देखील कायमचे वास्तव्य मौजे. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे राहत होते. मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचे पश्चात त्यांना अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नाहीत. मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचे नावे पोट तुकडी व तहसिल पन्हाळा, मौजे. कोडोली, ता. पन्हाळा येथील गट नं. २०५१ एकूण क्षेत्र ०० हे. १०.०५ आर, पो. ख. क्षेत्र ०० हे. ०१.०५ आर, आकार ०१ रु. ०५ पैसेची मिळकत तसेच मौजे. कोडोली, ता. पन्हाळा येथील सि. स. नं. ५९६ व ग्रा. पं. मि. नं. ६२५ ची घर मिळकत आहे. तसेच सदर मिळकतीबाबत वारसाने नोंद होणेकरिता अर्जदार यांनी मंडळ अधिकारी, कोडोली तसेच उप अधिक्षक भुमी अभिलेख, कोडोली यांचे कार्यालयात दि.

३०.१२.२०२५ रोजी वारसा अॅफिडेव्हीट दिले असता तेथील संबंधित अधिकारी यांनी कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचे सरळ व कायदेशीर वारस असलेबाबत वारसा दाखला घेवून येणेबाबत तोंडी कळविल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांनी आपले मृत्यूपूर्वी कधीही मृत्यूपत्र लिहून ठेवलेले नव्हते अगर नाही.

३. अर्जदार यांनी दैनिक नवसंदेश वृत्तपत्रात जाहीर नोटीस देवून तसेच जाहीरनामा प्रसिद्ध करुन देखील आज अखेर सदर अर्जास कोणीही हरकतदार कोर्टासमोर हजर झालेला नाही.

४. अर्जदार यांचा अर्ज, कागदपत्रे, प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. अर्जदार तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे मुद्दे निर्णयार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सहित मी खालील प्रमाणे नोंदविले आहेत.

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वारसा दाखला मिळविणेस अर्जदार हे पात्र व हक्कदार आहेत का ? | **होय.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ :-</u>**

५. अर्जदारांतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांनी दैनिक नवसंदेश या वृत्तपत्रात जाहीर नोटीस देवून तसेच जाहीरनामा प्रसिद्ध करुन देखील आज अखेर सदर अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही अगर अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणीही विरोध दर्शविलेला नाही. तसेच अर्जदार यांनी या अर्जाचे पृष्ठयर्थ त्यांचे सरतपासाचे

प्रतिज्ञापत्र **नि.११** व त्यांचे तर्फे साक्षीदार यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि. १२** येथे दाखल केले आहे. सबब त्यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेविषयी विनंती केली.

६. प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दैनिक नवसंदेश या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन देखील या कामी कोणीही न्यायालयासमोर हजर होवून अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज व अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रास हरकत घेतलेली नाही. अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ठर्थ अर्जदार तर्फे महादेव बंडु काईंगडे यांना दिलेले वटमुखत्यारपत्र **(नि.१० )**, तसेच मयत केशव काईंगडे यांचे मृत्यूप्रमाणपत्र **(नि.१३)**, तसेच मयत पार्वती काईंगडे यांचे मृत्यूप्रमाणपत्र **(नि.१४ )**, ग नं. ५९६ चे मालमत्ता पत्रक **(नि.१५)**, ग. नं. २०५१ चा सातबारा उतारा **(नि.१६)**, ग. नं. ६२५ चे करआकारणी पत्रक **(नि.१७)** व अर्जदार यांच्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत केशव लक्ष्मण काईंगडे हे दि.२३.०९.२०१७ रोजी मयत झालेले आहेत. तसेच पार्वती केशव काईंगडे या दि. १८.११.२०१० रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही हजर होवून आपण मयत केशव लक्ष्मण काईंगडे यांचे वारस आहोत असे न्यायालयासमोर सादर केलेले नाही. त्यामुळे अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत केशव लक्ष्मण काईंगडे यांचे अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच केशव लक्ष्मण काईंगडे हे मयत झाल्यामुळे अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असलेने ते वारस दाखला मिळविणेस पात्र व हक्कदार आहेत.

७. तसेच अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज, अर्जदार व त्यांचे तर्फे साक्षीदार यांचे प्रतिज्ञापत्र व अभिलेखावर दाखल कागदपत्रे तसेच वर नमूद कारणमिमांसा यांचा एकत्रीतरित्या विचार केला असता सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त व न्यायोचित होईल. त्याप्रमाणे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष देणेकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम ८ प्रमाणे

श्री. बंडु लक्ष्मण काईगडे
वि.कोणीही नाही.

## <u>आदेश</u>

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये अर्जदार यांचे नावे वारस दाखला देणेत यावा.

३. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद क्र. ३१२ अन्वये वारस दाखले मध्ये तशी टीप ठेवण्यात यावी.

6/7/26

दि. ०६.०७.२०२६

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.

# खर्चाचा आकडा

किरकोळ दिवाणी अर्ज १९/२०२६ नि.१ / ब सोबतची पुरवणी

| अ.नं. | तपशिल | अर्जदार | वि. प. कोणी नाही |
|---|---|---|---|
| १ | दावा अर्जास मुद्रांक | ५० | -- |
| २ | वकील पत्रास मुद्रांक | १० | -- |
| ३ | वकील फी | १५० | -- |
| ४ | दाखल केलेल्या कागदास मुद्रांक | ४० | -- |
| ५ | आदेशिका लागू करणेस मुद्रांक | -- | -- |
| ६ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ७ | जाहिरनामा प्रसिध्द खर्च | ८०० | -- |
| ८ | इतर अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ९ | कमिशनरची फी | -- | -- |
| | एकूण ... | १०५०/- | -- |
| | वजा न दिलेला खर्च | | |
| १ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| २ | कोर्ट फी परतावा | -- | -- |
| | एकूण ..... | १०५०/- | -- |

आज दिनांक ०६ माहे जुलै सन २०२६ इसवी रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

CIVIL JUDGE OF PANHALA

६/७/२६

क. लिपिक

( के.डी.काकतकर)
सह.दिवाणी न्यायाधीश क. स्तर पन्हाळा

अर्जदार तर्फे वकील - अॅड. दिपक पाटील पुकारता गैरहजर

वि. प. तर्फे वकिल - कोणी नाही

<u>टीप - या वादातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र ठरतील)</u>

## CHALLAN
### MTR Form Number-6

| GRN | MH005869122202627U | BARCODE | | Date | 06/07/2026-13:58:17 | Form ID | |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| Department | District And Sessions Court | **Payer Details** | |
| Type of Payment | Service and Service Fees<br>Court fees realised in cash including Amin and Pro | TAX ID (Case No.) | DSCTAX01 |
| | | PAN No.(If Applicable) | |
| Office Name | CIVIL COURT JR DIVISION PANHALA | Full Name | Shri Bandu Laxman Kaingad |
| Location | KOLHAPUR | | |
| Year | 2026-2027 One Time | Flat/Block No. | |
| | | Premises/Building | |
| | | Road/Street | |
| | | Area/Locality | |
| | | Town/City/District | |
| | | PIN | |
| | | Remarks (Party Details) | MHKO17 |
| | | Amount In Words | Two Hundred Rupees Only |

| Account Head Details | Amount In Rs. |
|---|---|
| 0070028801 Court Fee | 200.00 |
| Total | 200.00 |

| Payment Details | STATE BANK OF INDIA | FOR USE IN RECEIVING BANK | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 00040572026070607567 | CPAGYJRIZ7 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 06/07/2026-13:24:59 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : CMHKO172026611096L

Mobile No. : XXXXXX3940



Print Date 06-07-2026 01:59:19

**CHALLAN**
**MTR Form Number-6**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **GRN** | MH005869122202627U | **BARCODE** | | **Date** | 06/07/2026-13:58:17 | **Form ID** | |

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | District And Sessions Court | **Payer Details** | |
| **Type of Payment** | Service and Service Fees<br>Court fees realised in cash including Amin and Pro | **TAX ID (Case No.)** | DSCTAX01 |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** | CIVIL COURT JR DIVISION PANHALA | **Full Name** | Shri Bandu Laxman Kaingad |
| **Location** | KOLHAPUR | | |
| **Year** | 2026-2027 One Time | **Flat/Block No.** | |
| | | **Premises/Building** | |

| **Account Head Details** | **Amount In Rs.** |
|---|---|
| 0070028801 Court Fee | 200.00 |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| **Total** | 200.00 |

| | |
|---|---|
| **Road/Street** | |
| **Area/Locality** | |
| **Town/City/District** | |
| PIN | |
| **Remarks (Party Details)** | |
| MHKO17 | |
| **Amount In Words** | Two Hundred Rupees Only |

DEFACED
₹200.00
DEFACED

| | |
|---|---|
| **Payment Details** | STATE BANK OF INDIA |
| **Cheque-DD Details** | |
| Cheque/DD No. | |
| Name of Bank | |
| Name of Branch | |

| **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
|---|---|---|---|
| Bank CIN | Ref. No. | 00040572026070607567 | CPAGYJRIZ7 |
| Bank Date | RBI Date | 06/07/2026-13:24:59 | Not Verified with RBI |
| Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

**Challan Defaced Details**

Department ID : CMHKO172026611096L

Mobile No. : XXXXXX3940

| **Sr. No.** | **Remarks** | **Defacement No.** | **Defacement Date** | **UserId** | **Defacement Amount** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | R200300000192026 | 0003283649202627 | 06/07/2026-16:14:59 | DSC115 | 200.00 |
| | | | **Total Defacement Amount** | | **200.00** |



**Print Date 06-07-2026 04:15:52**

टीप - कोर्ट फी स्टॅंप रु.२००/- जोडला आहे.    अर्जदार तर्फे वकील अॅड. दिपक.पाटील

वारसा प्रमाणपत्र

किरकोळ दिवाणी अर्ज नं. १९/२०२६
नि.नं.१८/बी

१) श्री. बंडु लक्ष्मण काईंगडे
व.व.९१, धंदा-शेती,
रा. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

......... अर्जदार

विरुध्द

१. कोणीही नाही    ......... वि.प.

बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ (VIII)
प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी अर्ज.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे दि. ०४/०४/२०२६ इ. रोजी अर्ज दाखल करुन यातील अर्जदार यांचे नम्रपणे कळविणे की, यातील अर्जदार हे वर नमुद पत्यावर कायमचे रहिवाशी आहेत. यातील अर्जदार यांचे भाऊ केशव लक्ष्मण काईंगडे हे ता. २३/०९/२०१७ इ. रोजी मौजे कोडोली, ता. पन्हाळा येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत. तसेच त्यांची पत्नी कै. पार्वती केशव काईंगडे या दि. १८/११/२०१० इ. रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांना कोणतेही अपत्य नाहीत. ते दोघेही यातील अर्जदार यांचे समवेत वर नमुद पत्यावर राहत होते. तसेच मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचा सांभाळ, औषधपाणी, कपडेलत्ता हे सर्व यातील अर्जदार यांनीच केलेले आहेत. तसेच ते हयात असताना देखील कायमचे वास्तव्य मौजे कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथेच होते. मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचे पश्चात त्यांना वर नमुद अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही हिंदू वारसा कायद्या अन्वये सरळ व कायदेशीर वारस नाहीत. मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचे नावे पोट तुकडी व तहसिल पन्हाळा, मौजे कोडोली, ता. पन्हाळा येथील गट नं. २०५१ एकुण क्षेत्र ०० हे.१०.०५ आर, पो.ख.क्षेत्र ०० हे.०१.०५ आर, आकार ०१ रु. ०५ पैसेची मिळकत. तसेच मौजे कोडोली, ता. पन्हाळा येथील सि.स.नं.५९६ व ग्रा.पं.मि.नं.६२५ ची घर मिळकत. येणेप्रमाणे नमुद केलेल्या मिळकतीबाबत तसेच त्यांचे मालकीचे अन्य स्थावर व जंगम मिळकतीबाबत मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचे पश्चात अर्जदार यांना हक्क व अधिकार प्राप्त झालेला असुन ते कायदेशीर वारस आहेत. सदर मिळकतीचे कागदोपत्री अर्जदार यांचे नावे वारसा हक्काने नोंद होणेकरीता त्यांचे वारस अर्जदार आहे. असे ठरवुन मिळणेकरीता अर्जदार यांना अर्ज दाखल करणे भाग पडत आहे. कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांना वर नमुद अर्जदार सरळ व कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरीक्त कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांना अन्य कोणीही वारस नाहीत.त्यामुळे कै.केशव लक्ष्मण काईंगडे यांचे मृत्युनंतर शासकीय कामाकरीता त्या अनुषंगाने अर्जदार हेच मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचे वारस असलेबाबत वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज यातील अर्जदार यांनी मे. कोर्टात दाखल केलेला आहे. वर नमुद मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे यांचे मृत्युनंतर शासकीय कामाकरीता त्यांचे नावे असलेल्या कोडोली, ता. पन्हाळा येथील गट नं.२०५१ एकुण क्षेत्र ००.हे.१०.०५ आर, पो.ख.

क्षेत्र ०० हे.०१.५ आर, आकार ०१ रु. ०५ पैसेची मिळकत. तसेच मौजे कोडोली, ता. पन्हाळा येथील सि.स.नं.५९६ व ग्रा.पं.मि.नं.६२५ या मिळकतीस वारसाने नोंद होणेकरीता अर्जदार यांनी मा. मंडळ अधिकारीसो, कोडोली तसेच मा. उप अधिक्षक भुमी अभिलेख, कोडोली यांचे कार्यालयात दि.३०/१२/२०२५ इ. रोजी वारसा ॲफिडेव्हीट दिले असता कायदेशीर वारस असलेबाबत वारसा दाखला घेवुन येणेबाबत तोंडी कळवले तेव्हा व तदनंतर वेळोवेळी प्रस्तुत अर्जास कारण घडले आहे.

सदरच्या अर्जाबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अर्जदार यांनी दि.०५/०४/२०२६ इ. रोजी दैनिक नवसंदेश, कोल्हापूर मध्ये वर्तमानपत्रात जाहिरनामा प्रसिध्द केलेला आहे. तसेच त्याच्या प्रती १. मयत कै. केशव लक्ष्मण काईंगडे रा. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील घरावर लावणेसाठी,२. गाव चावडी / ग्रामपंचायत रा.कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, ३. नोटीस बोर्ड, दि.न्या.क.स्तर, पन्हाळा येथे प्रसिध्द करणेत आल्या. तथापि त्या जाहिरनाम्याच्या व वर्तमानपत्रातील नोटीसच्या अनुषंगाने कोणीही हरकत अथवा तक्रार दाखल केलेली नाही.

म्हणून मयत कै.केशव लक्ष्मण काईंगडे यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे साक्षी पुराव्यावरून सिध्द झाल्याने दि.०६/०७/२०२६ इ. रोजीचे आदेशानुसार सदरचा वारसा दाखला अर्जदार यांना देण्यात येत आहे.

अर्जदार यांनी सदर प्रमाणपत्राकरीता आवश्यक असणारा न्यायालयीन शुल्काचा मुद्रांक रु.२००/- जमा केला आहे.

सदर कामी मा.न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश केला आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये अर्जदार यांचे नावे

वारस दाखला देणेत यावा.

३. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद क्र.३१२

अन्वये वारस दाखले मध्ये तशी टीप ठेवण्यात यावी.

०६/७/२६

दि.०६/०७/२०२६

( के.दि.काकतकर )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पन्हाळा

आज दि.०६ माहे जुलै सन २०२६ इ. रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिवाणी नियमावलीच्या क्र.१४ च्या परिच्छेद क्र. ३१२ व ३१३ नुसार तळटीप -

या प्रमाणपत्राआधारे मिळालेल्या अथवा ताब्यात आलेली मिळकतींची खरी आणि सविस्तर माहिती प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून सहा महिन्याच्या आत अथवा मुदतवाढ मिळाल्याच्या तारखेपर्यंत अर्जदारांनी न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. तसेच या प्रमाणपत्राच्या आधारे मिळालेल्या अथवा ताब्यात आलेल्या मिळकतींचा कशा पध्दतीने वापर करण्यात आला अथवा विल्हेवाट लावण्यात आली याबाबतची माहिती देखील प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या आत अथवा मुदतवाढ मिळाल्याच्या तारखेपर्यंत अर्जदाराने न्यायालयात दाखल करणे आवश्यक आहे. अशी कोणतीही माहिती न्यायालयास सादर न केल्यास अर्जदार भारतीय दंड विधानाच्या कलम १७६ अन्वये व भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ मधील कलम ३१७,३९० नुसार कार्यवाहीस पात्र राहील.